**Pudhari, (Friday, 5th July 2019)**

# केपेत विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राविषयी माहिती

**पणजी : प्रतिनिधी**

भारत देश कृषी प्रधान असून शेती हे गोव्यासाठी फार महत्त्वाचे क्षेत्र आहे. युवा पिढी आज काही प्रमाणात शेतीकडे वळली असून कृषी क्षेत्रात व्यावसायिक बनण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. सुलकर्णे केपे येथील डॉन बॉस्को शेती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्राविषयी माहिती व्हावी, यासाठी पुढाकार घेतला आहे.

राज्यातील शेतकरी शेती, भाज्या व पशुपालनावर अवलंबून आहेत. मात्र, आजच्या काळात आधुनिक तंत्रांची जाण नसल्याने याचा परिणाम शेतकऱ्याच्या मिळकतीवर होतो. शेतकऱ्यांना अनेकदा शेतीच्या कामात तोटाच वाट्याला येतो. त्यामुळे सावर्डे येथील शेतकऱ्यांना सध्या आम्ही शेतीसाठी उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती देत आहोत, असे विद्यार्थी सनील गावकर याने सांगितले.

या विद्यार्थी गटात सहा विद्यार्थी असून यात सनिल गावकर, अक्षय सावंत, पवन सावंत, महेंद्र कदम, स्वप्नील गुरव व ब्रिजेश फळदेसाई या विद्यार्थ्यांचा यात समावेश आहे. ते शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देऊन त्यांना शेतकामात मदतही करीत आहेत. ग्रामीण शेतकाम अनुभव या विद्यालयाच्या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थी शेतकऱ्यांना माहिती पुरवत आहेत.




पणजी : सावर्डे येथील शेतकऱ्यांसोबत विद्यार्थी. (छाया : समीर नार्वेकर)

या उपक्रमाला १० जून २०१९ रोजी सुरूवात करण्यात आली आहे. विद्यार्थी गावात जाऊन गावातील शेती सर्वेक्षण करीत आहेत. त्याबरोबर शेती, बी, पीक लावण्याची पध्दत, पाणी देण्याची पध्दत, खत घालणे, पीकांना कीड लागण्यापासून वाचविण्याच्या पध्दतींवर विद्यार्थी अभ्यास करीत आहेत, असेही सनिल गावकर याने सांगितले.